"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्यास मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग.**

**शासन परिपत्रक क्रमांक- मबावि २०२५/प्र.क्र.१६७/कार्या-२,**

नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:-१८ सप्टेंबर, २०२५.

**संदर्भ:-**

१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२, दि.२८.०६.२०२४. दि.०३.०७.२०२४. दि.१२.०७.२०२४.

२) महिला व बाल विकास विभाग, शासन अधिसूचना क्र. मबावि २०२४/प्र.क्र.१५३/कार्या-२, दि.०१.०८.२०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजनेची प्रभावी अंमलबजाणी करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलेला थेट लाभ हस्तांतरणाव्दारे (Direct Benefit Transfer) आर्थिक लाभाची रक्कम जमा करण्यात येत आहे.

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेसंदर्भात आधार (आर्थिक आणि इतर अनुदाने, लाभ आणि सेवांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ च्या कलम ७ मधील तरतुदींच्या अनुषंगाने दि.०१.०८.२०२४ अन्वये शासन अधिसुचना अधिसूचित केली आहे. सदर अधिसूचनेनुसार "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत लाभ घेण्यास पात्र असलेली व्यक्ती आधार क्रमांक बाळगत असल्याचा पुरावा सादर करेल किंवा आधार अधिप्रमाणन करेल" असे नमूद केलेले आहे.

मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार दरवर्षी जून महिन्यात या योजनेतील लाभार्थ्यांचे ekyc करावयाचे आहे. महिला व बाल विकास विभागाची Sub-AUA/Sub-KUA म्हणून UIDAI ने नियुक्त केली आहे. त्यामुळे महिला व बाल विकास विभागाकडून सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्यात येत आहे. त्यानुषंगाने "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेच्या Web Portal वर e-KYC ची सुविधा उपलब्ध करुन देऊन सदर योजनेतंर्गत पात्र लाभार्थी महिलांची

पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्याची बाब शासन विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेच्या https://ladakibahin.maharashtra.gov.in या Web Portal वर सदरची e-KYC ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने या Web Portal वर लाभार्थांना प्रत्यक्षात e-KYC बाबत करावयाची कार्यवाहीची माहितीचा Flowchart "परिशिष्ट- अ" मध्ये देण्यात आला आहे. त्यानुसार सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण चालू आर्थिक वर्षात या परिपत्रकाच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या आत पुर्ण करणे बंधनकारक आहे. सदर कालावधीत ज्या लाभार्थ्यांनी Aadhaar Authentication केले नाही, ते पुढील कार्यवाहीस पात्र राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

३. तसेच या योजनेंतर्गत दरवर्षी जून महिन्यापासून २ महिन्यांच्या कालावधीत या योजनेतील लाभार्थ्यांनी e-KYC करणे बंधनकारक राहील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५०९१८१६१०१३४७३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANAND NARAYANRAO BHONDVE

Digitally signed by ANAND NARAYANRAO BHONDVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=a11586f7ebf5942c9727d91c8c251f01dab61da28a62264d92646e4dc3827d4d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D040EF80427E869FA7C6F2F326EAF61F9B4591294C9BE6229580E816D54D3859, cn=ANAND NARAYANRAO BHONDVE
Date: 2025.09.18 17:14:58 +05'30'

**(आ.ना. भोंडवे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
६. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

८. मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मा.मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई,
१०.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२.विभागीय आयुक्त (सर्व),
१३.आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१४.जिल्हाधिकारी (सर्व),
१५.महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१६.महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९.सह सचिव, उपसचिव, अवर सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०.सर्व सह आयुक्त/उप आयुक्त / विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,
२१.सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय पुणे मार्फत),
२२.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय पुणे मार्फत),
२३.महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने),
२४.निवड नस्ती, कार्यासन-२

**"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेच्या लाभार्थ्यांना प्रत्यक्षात E-kyc बाबत करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या माहितीचा Flowchart:-**

**"परिशिष्ट-अ"**

लाभार्थ्यांनी https://ladakibahin.maharashtra.gov.in या **Website** ला भेट द्या.

↓

मुखपृष्ठावरील **eKYC Banner** वर Click करा.

↓

eKYC फॉर्म उघडेल → लाभार्थींनी आधार क्रमांक व पडताळणी संकेतांक कोड (Captcha) नमूद करावा तसेच, आधार प्रमाणीकरणासाठी संमती दर्शवून Send OTP बटणावर Click करा.

↓

आपले **eKYC** या आधीच पूर्ण झाले आहे किंवा नाही हे तपासले जाईल.

**होय** ↓

**"eKYC आधीच पूर्ण झाली आहे"** असा संदेश प्राप्त होईल.

↓ **नाही**

आधार क्रमांक लाभार्थ्यांच्या मंजूर यादीत आहे की नाही, तपासला जाईल.

**नाही** ↓

**"आधार क्रमांक मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र यादीत नाही"** असा संदेश

↓ **होय**

लाभार्थ्याच्या (Aadhar linked) मोबाईलवर प्राप्त झालेला OTP – " OTP स्क्रीनमध्ये टाकून **Submit** बटणावर Click करा.

↓

नंतर eKYC पृष्ठावर **पती/वडील यांचा आधार क्रमांक** नमूद करुन पडताळणी संकेतांक कोड (Captcha) नमूद करावा तसेच, आधार प्रमाणीकरणासाठी संमती दर्शवून **Send OTP** बटणावर Click करा.

↓

नंतर पती/वडील यांच्या (Aadhar linked) मोबाईलवर प्राप्त झालेला **OTP** - " OTP स्क्रीनमध्ये टाकून **Submit** बटणावर Click करा.

↓

**यानंतर लाभार्थ्याने:-**

(i) जात प्रवर्ग पर्याय निवडावा.

(ii) खालील बाबी प्रमाणित **(Declaration)** कराव्यात:-

१) माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत नाहीत. **(होय / नाही)**

२) माझ्या कुटुंबातील केवळ १ विवाहित आणि १ अविवाहित महिला लाभ घेत आहे? **(होय / नाही)**

नंतर चेक बॉक्स **Click** करुन **Submit** बटणावर क्लिक करा.

↓

**"Success तुमची ई-केवायसी पडताळणी यशस्वीरित्या पुर्ण झाली आहे"** असा संदेश येईल.